PTVA Schools
# दर्पण
For private circulation only
VOLUME: 04 | ISSUE : 06 | 12 PAGES
July 2026

**संस्कृत श्लोक**

वहन्ति वर्षन्ति नदन्ति भान्ति
ध्यायन्ति नृत्यन्ति समाश्वसन्ति |
नद्याः घनाः मत्गजाः वनान्ताः
प्रियाविहीनाः शिखिनः प्लवंगाः ||

या श्लोकाचा अर्थ वाचा पान १० वर



**रक्षाबंधन**

रक्षाबंधन हा भाऊ-बहिणीच्या अतूट प्रेम आणि आपुलकीचा सण आहे. हा सण श्रावण महिन्यातील पौर्णिमेला साजरा केला जातो. या दिवशी, बहीण आपल्या भावाच्या हातावर राखी बांधते आणि त्याच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करते, तर भाऊ तिला तिचे रक्षण करण्याचे वचन देतो.

## Editorial

## "एका नव्या प्रांगणात"

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ ची सुरुवात आपल्या इमारतीच्या बदलाने झाली. जुनी इमारत सोडताना दुःख होतेच पण ज्या वास्तूत आपल्याला जायचे आहे तिच्याबद्दलची उत्सुकताही मनात असते, तशीच ती आपल्या सगळ्यांच्याच मनात होती.

मुलांनो, आता आपण ज्या इमारतीत आहोत ती इमारत आपल्यासाठी अनोळखी नाही. कारण तुमच्यापैकी काही जणांच्या आजोबा- आजी, आई-बाबा आणि ताई-दादांनीही याच शाळेतून आपल्या प्राथमिक शिक्षणाची सुरुवात केली असणार.



आपल्या आत्ताच्या शाळेची इमारत बघताक्षणी आपलीशी वाटणारी, मैदानाला तीनही बाजूंनी कवेत घेणारी, एका बाजूला विहिरीची सोबत असणारी अशी आहे. मला वाटते पार्ल्यातील कित्येक मुले आणि मुली याच विहिरीवर पोहायला शिकली असावीत. इमारतीच्या दोन्ही बाजूला प्रशस्त जिने, वर्गांमध्ये भरपूर प्रकाश, वर्गासमोर असणारा व्हरांडा आणि तिसऱ्या मजल्यावरील प्रशस्त सभागृह, नववी आणि दहावीसाठी वर्गांमध्ये नवीन तंत्राने (smart board) शिकण्याची सोय आणि सगळ्यात महत्वाचे म्हणजे या वास्तूत असलेली सकारात्मक ऊर्जा माझ्या सर्व शिक्षक बंधू- भगिनींना व तुम्हा विद्यार्थ्यांनाही भावली असेल.

आपल्या आधीच्या शाळेतून या शाळेत स्थलांतर करत असताना आपल्या सगळ्या शिपाईकाकांचे, सफाई करणाऱ्या मावशी व काकांचे, माझ्या सहकाऱ्यांचे सहकार्य मला मिळाले. पार्ले टिळक विद्यालयाच्या संचालक मंडळाच्या मार्गदर्शनाने आणि माजी मुख्याध्यापिका श्रीमती मिठे बाई यांच्या मदतीने हे काम सुलभतेने झाले त्याबद्दल मी सगळ्यांचीच आभारी आहे. या वास्तूत आमची मराठी शाळा पुन्हा एकदा बहरेल असा विश्वास मला आणि सगळ्या शिक्षकांना वाटतो.

धन्यवाद!!

**श्रीमती सुचेता लघाटे**
**मुख्याध्यापिका पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यमिक**

# PTVA Schools Keep Warkari Tradition Alive



PTV ICSE (Secondary)


PTVEMS (Primary)

The spirit of devotion and Maharashtra's rich Warkari tradition came alive across PTVA schools as students celebrated Ashadhi Ekadashi with enthusiasm.

At PTVEMS (Primary), the programme beautifully showcased the rich heritage of the Warkari tradition and inspired students to imbibe the values of faith, humility, and unity. The celebration commenced with a warm welcome to the gathering, followed by an insightful speech on the significance of Aashadhi Ekadashi by teacher Mrs Bhavika Kulkarni, who highlighted the importance

• Pg. 2

# आषाढी एकादशी व बालदिंडी सोहळा उत्साहात साजरा


पार्ले टिळक विद्यालय इंग्लिश मिडीयम स्कूल माध्यमिक


पार्ले टिळक विद्यालय मराठी प्राथमिक

'विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल, ज्ञानोबा माऊली तुकाराम' या जयघोषाने पार्ले टिळक विद्यालय असोसिएशनच्या शाळांमध्ये आषाढी एकादशीनिमित्त विविध कार्यक्रम करून दिंडी काढण्यात आली.

आषाढी एकादशीचे औचित्य साधून पार्ले टिळक प्राथमिक मराठी शाळेत बाल दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. दिंडीमध्ये सहभागी होण्यासाठी सर्व विद्यार्थी पारंपरिक वारकरी पोशाखात आले होते. तसेच पार्ले टिळक विद्यालय इंग्लिश मिडीयम स्कूलच्या माध्यमिक विभागातर्फे शाळेच्या मुख्याध्यापिका स्मिता बिवलकर, उपमुख्याध्यापिका वसुंधरा पांडे आणि पर्यवेक्षिका विनीता नायर यांच्या

• पान २ वर

# New Student Council Takes Charge at PTVA Schools


PTVA's EMS, Andheri


PTVEMS (Secondary)

Student Council for the academic year 2026-27 was declared this month in Investiture Ceremonies across PTVA schools.

At PTVEMS (Primary), the event marked a significant milestone, as the newly elected student council members were formally entrusted with their responsibilities, symbolising the official beginning of their leadership journey. The highlight of the day was the formal conferring of badges and sashes. Headmistress, Mrs Sunita Bhagwat, invested the newly elected Head Boy, Head Girl, House Commanders, and Vice-Commanders. Following this, the Prefects were proudly conferred with their badges by Headmistress Mrs Sunita Bhagwat and Supervisor, Mrs Urmila Bhende. School Student Government (2026–2027): Head Boy - Kriyansh Raorane (Std. IV C, Yellow House); Head Girl - Agamya Temgire (Std. IV D, Blue House) | Red House - Sangu Gothad (Std. IV A) and Smaran Gujar (Std. IV D) | Blue House - Megan Dhavale (Std. IV C) and Shubhra Kerkar (Std. IV B) | Green House - Anura Satam (Std. IV A) and Avni Deshmukh (Std. IV D) | Yellow House - Vyom Narkar (Std. IV D) and Sara Nighojkar (Std. IV A). In a solemn moment, the Head Boy and Head Girl, along with the rest of the council members, took their oath, pledging to uphold the school's core values and lead by example. Headmistress congratulated the newly elected student leaders and shared words of wisdom that resonated deeply with everyone present. She reminded them that true leadership is not about authority, but about service. Following this unforgettable inspiring ceremony, the students returned to their respective classes, ready to take on the new academic year with vision and determination.

The Investiture Ceremony of PTVEMS (Secondary) was held with great pride and enthusiasm on 30 June in the presence of Headmistress, Mrs Smita Biwalkar, Deputy Headmistress, Mrs Vasundhara Pandey, Supervisor, Mrs Vinitha Nair, teachers and students. The ceremony marked the formal induction of the newly elected Student Council.

• Pg. 2


PTVA's EMS, Andheri



PTV ICSE (Primary)

# PTVA Schools Keep Warkari Tradition Alive

(From Pg.1)

of devotion to Lord Vitthala and the spiritual essence of the holy day. Students and teachers then embarked on a virtual tour of Pandharpur, offering a glimpse of the sacred Vitthal-Rukmini Temple and the vibrant Warkari pilgrimage. The virtual experience enabled students to connect with the traditions and cultural significance of Pandharpur. The programme continued with the Aarti of Lord Vitthala, followed by a melodious devotional group song, creating a serene and spiritually uplifting atmosphere. Both the Aarti and the devotional group song were beautifully directed by teacher Mrs Monali Ambekar. The students captivated the audience with a graceful Bhakti Dance Performance dedicated to Lord Vitthala. The Bhakti Dance and Taal Instrumental Performance were meticulously directed by teachers Mrs Bhavika, Mrs Nisha, and Mrs Soniya, whose guidance ensured a vibrant, disciplined, and captivating presentation. The celebration also featured a Rhythmic Group Dance choreographed by teachers Mrs Manashri, Mrs Kamakshi, and Mrs Priyanka. The programme concluded with the traditional Dindi Procession, where students dressed as Warkaris joyfully chanted the name of Lord Vitthala, recreating the spirit of the sacred pilgrimage to Pandharpur.

The sacred festival of Aashadhi Ekadashi was celebrated with great devotion and enthusiasm at PTVA's EMS, Andheri. The celebration began with a Dindi procession in the school premises. Students dressed as Warkaris with saffron attire, tulsi malas, and carrying Palkhi and flags walked chanting

Scan the QR codes to watch the Ashadhi Ekadashi celebrations of PTVA Schools.

PTV ICSE (Primary) | PTVEMS (Primary)

"Dnyanba-Tukaram" and "Vitthal Vitthal". This was followed by a cultural programme in the auditorium. The programme commenced with the Aarti of Lord Vitthal. Students then presented 'Manache Shlok' recital, Abhangs, devotional songs and a dance that beautifully depicted bhakti and the values of Warkari Sampradaya. The devotional music and rhythm created a serene and spiritual ambience. The highlight of the programme was the Bharud presented by the students. Their expressive performance, dialogues, and message received loud applause and truly won the hearts of the audience. The event concluded with Pasaydan recited by the teachers. A board work depicting Lord Vitthal added to the festive spirit. A display gallery with beautiful pictures of Vitthal-Rakhumai was also set up, which became a major attraction for students. The celebration ended with the distribution of Prasad to all students.

At PTV ICSE (Primary), a spiritually enriching Mass Assembly introduced students to the rich cultural heritage and traditions of Maharashtra. The programme commenced with a warm welcome by the comperes, followed by an informative presentation on the significance of Ashadhi Ekadashi. A vibrant Dindi procession beautifully recreated the spirit of the pilgrimage to Pandharpur. The highlight of the assembly was a thought-provoking Keertan, which seamlessly blended traditional devotional storytelling with a contemporary social message, encouraging students to reduce excessive mobile phone usage and adopt healthy screen-time habits. An inspiring address by Marathi HOD, Mrs Jyoti Dandekar, beautifully reinforced the timeless values of faith, humility, perseverance and selfless service. The programme came to a fitting close with a graceful dance performance celebrating the spirit of Ashadhi Ekadashi and the vibrant traditions of the Warkari community. The celebration provided students with a meaningful understanding of Maharashtra's rich cultural legacy while reinforcing values of discipline, gratitude, balanced living and respect for our traditions.

Similarly, at PTV ICSE (Secondary), the celebration began with the worship of Lord Vitthal and Goddess Rukmini, followed by a traditional Dindi procession featuring saffron flags, Tulsi Vrindavans, Lezim, Fugdi, and students dressed as saints such as Sant Dnyaneshwar and Sant Tukaram, symbolising devotion, unity, and the rich legacy of the Warkari tradition. The programme included soulful Abhangs, a Bharud promoting the eradication of superstition, a thought-provoking skit "Zhale Mokale Aakash" advocating scientific thinking, and graceful dance performance. The Principal, Dr (Mrs) Arnavaz Bhagat extended warm Aashadi Ekadashi greetings to all. The programme concluded with a heartfelt vote of thanks, expressing gratitude to the Principal, teachers, students and everyone who contributed to the successful celebration.

# आषाढी एकादशी व बालदिंडी सोहळा उत्साहात साजरा

(पान १ वरून)

उपस्थितीत शाळेतील शिक्षकवृंद आणि विद्यार्थ्यांनी उत्साहात कार्यक्रम साजरा केला. शाळेचे कलाशिक्षक विठ्ठल चव्हाण यांनी फलकावर साकारलेली विठ्ठलाची सुंदर प्रतिमा सगळ्यांचेच लक्ष वेधून घेत होती. कलाशिक्षिका गीतांजली महाले यांनी विठोबा आणि वारीच्या विविध चित्रांनी फलक सजावट केली होती.

शाळेतील मराठी विषय शिक्षिका अन्वया काणे यांनी आषाढी एकादशी आणि पंढरपूरच्या वारीचे धार्मिक, सामाजिक आणि वैज्ञानिक महत्त्व विशद करणाऱ्या भाषणाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कवयित्री मृणालिनी कानिटकर- जोशी लिखित 'वारी' या सुंदर कवितेचे अभिवाचनही त्यांनी याप्रसंगी केले. यानंतर शाळेच्या संगीत शिक्षिका वृशाली वीरकर यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील विद्यार्थ्यांनी 'ज्ञानियांचा राजा' या संत तुकारामांच्या अभंगाचे सुंदर सादरीकरण केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपमुख्याध्यापिका वसुंधरा पांडे यांनी केले. दिंडीचे आयोजन शाळेतील शारीरिक शिक्षण विषयाचे शिक्षक जितेंद्र पाटील आणि परेश इप्ते यांनी केले होते.


परांजपे विद्यालय

पार्ले टिळक विद्यालयातील आषाढी एकादशी कार्यक्रमाचे सादरीकरण पाहण्यासाठी QR कोड्स स्कॅन करा.

PTVEM Secondary | PTVMM Primary | PTVMM Secondary

आषाढी एकादशीचे औचित्य साधून शाळेच्या मराठी वाङ्मय मंडळातर्फे इयत्ता सातवी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी एक विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. संतांच्या मोलाच्या कार्याचा परिचय करून देणारे 'संतकृपा झाली' हे अन्वया काणे लिखित दिग्दर्शित संगीत नाटक विद्यार्थ्यांनी सादर केले. विद्यार्थ्यांनी वाद्यवृंदाच्या साथीने स्वतः गायलेल्या संतांच्या अभंगरचना हे या नाटकाचे खास वैशिष्ट्य ठरले. संगीत संयोजनाचीही जबाबदारी डॉ. विज्ञापना गोकर्णकर यांनी समर्थपणे पेलली.

'संतांनी समाजाला दिलेली मूल्ये चिरंतन आहेत आणि आजच्या अनेक समस्यांवरचे उपाय आपल्याला या संतरचनांमध्ये सापडतात' हा महत्त्वाचा संदेश या नाटकातून विद्यार्थ्यांना मिळाला.

परांजपे विद्यालयात कार्यक्रमाची सुरुवात पर्यवेक्षिका सौ. लाड यांच्या हस्ते श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करून झाली. यानंतर सौ. बर्वे यांनी ध्वनीक्षेपकावरून आषाढी एकादशीचे धार्मिक, सांस्कृतिक व आध्यात्मिक महत्त्व तसेच वारकरी संप्रदायाची परंपरा, संतांचे विचार आणि भक्तीचे महत्त्व यांविषयी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. यानंतर विद्यालयात भव्य दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

त्यानंतर विद्यालयाच्या सभागृहात मराठी वाङ्मय मंडळाचा उद्घाटन सोहळा उत्साहात संपन्न झाला. पर्यवेक्षिका सौ. लाड मॅडम यांच्या हस्ते ग्रंथपूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे नियोजन व संयोजन सौ. बर्वे आणि श्रीम. शिर्के यांनी केले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी पाऊस या विषयावर आधारित गाणी, कविता आणि कथांचे सुरेख सादरीकरण करून उपस्थितांची वाहवा मिळवली. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# New Student Council Takes Charge at PTVA Schools

(From Pg.1)

The programme began by highlighting the rigorous selection process undertaken each year to identify students who demonstrate exemplary leadership, integrity, responsibility and commitment. Parth Adarkar (Std. IX C) was appointed as the Head Boy and Sthira Divekar (Std. IX D) as the Head Girl for the academic year. The House Commanders and Vice Commanders elected through the school's democratic election process were also announced. C. V. Raman House - Commander: Aditya Varankar (Std. IX C, Vice Commander: Ananya Dure (Std. IX B) | Kusumagraj House - Commander: Devansh Ghadi (Std. IX D), Vice Commander: Harshit Ayare (Std. IX D | Premchand House - Commander: Harsh Kadam (Std. IX D, Vice Commander: Diya Varma (Std. IX B) | J. C. Bose House - Commander: Daivik Patole (Std. IX B), Vice Commander: Mudra Zagade (Std. IX C). The elected student leaders were invited to the dais to receive their badges, symbolising the responsibilities and trust bestowed upon them. The election witnessed an impressive voter turnout, with 1,135 votes cast, recording an 88% voting rate. The election was conducted flawlessly, with not a single invalid vote. Appreciation was extended to the teachers-in-charge, Mr Jitendra Patil, Mr Paresh Ipte, Mrs Swati Thakur Desai, Mrs Minal Deo and Mrs Kavita Kapoor.

PTVA's EMS, Andheri, also hosted its Investiture Ceremony for the 2026–27 school year to officially welcome the new Student Council. Leading up to the big day, the school held democratic elections for House Commanders, while the Head Boy (Darsh Salvi) and Head Girl (Aarvi Salian) won their spots after intense interview rounds. The event kicked off with a



PTVEMS (Primary)

welcome from the school band, followed by lighting the ceremonial lamp and honouring the statue of Lokmanya Tilak. Principal Mrs Mrinalini Mhetre gave an inspiring speech before introducing the four House Commanders: Agni - Nivida Mondkar, Jal - Kshitij Shinde, Pruthvi - Vihaan Chorghe, and Vayu - Shlok Shinde. In the main event, the Principal handed out sashes and badges to the council members and administered their official oath. The leaders promised to serve with sincerity and fairness, wrapping up a super inspiring day focused on leadership and school pride!

**Clue 1:**
**It is the act of protecting forests, rivers, animals, and natural resources so future generations can enjoy them too.**

# Nature Club makes a difference during Vanmahotsav Week

The Nature Club of PTVEMS (Secondary) celebrated Vanmahotsav Week with a variety of engaging activities that encouraged students to connect with and care for nature.

The celebrations began with a Mother–Child Sapling Plantation activity. Students, along with their mothers, planted saplings such as tulsi, ova and rose in pots. The activity aimed to instil in children a sense of responsibility by encouraging them to nurture the plants as they grew.

The Plant Exhibition, put up by the students of Class IX, was another highlight of the week. Plants from the Nature Club garden, including hibiscus, tulsi, aloe vera, mint, adulsa and bryophyllum, were displayed. Students of Classes VII and VIII visited the exhibition, where the young presenters confidently shared interesting



**Clue 2 :**
**It is a community where plants, animals, micro-organisms and their environment all interact, are interdependent, and live in harmony.**

facts about the plants, their identifying features, common and scientific names and medicinal uses. The exhibition helped students appreciate the rich variety of plants around them and understand their importance in our daily lives.

A moving radio skit presented by the students left a lasting impression on the audience. Through a conversation between a hundred-year-old tree and human desire, the skit conveyed the message that while development is essential, it should never come at the cost of the environment. The programme concluded with a soulful song that traced the journey of a tiny seed into a majestic tree, celebrating the countless ways in which trees enrich and sustain life.

The week was a meaningful reminder that every small step taken towards protecting nature can make a big difference. The activities were organised under the guidance of the Nature Club advisers, Mrs Kavita Kapoor, Mrs Anjali Bhoj, Mr Kalpesh Satra, Mrs Shashi Gupta, and Mr Pritam Purav.

## A Legacy of Excellence, A Future of Promise

On the occasion of its 45th Foundation Day, PTVEMS (Secondary) proudly celebrates a legacy of academic excellence, values and holistic education. Established on 29 June 1982 under the visionary guidance of the Parle Tilak Vidyalaya Association, founded in 1921 in memory of Lokmanya Bal Gangadhar Tilak, the school has grown into a vibrant institution committed to nurturing responsible, compassionate and confident citizens.



Over the past 44 years, PTVEMS has upheld the ideals of knowledge, discipline, creativity and social responsibility. The school acknowledges the invaluable contributions of its former leaders, dedicated teachers, supportive parents, non-teaching staff and the present management, whose collective efforts have shaped its remarkable journey.

As education evolves, PTVEMS remains committed to preparing students for the future by fostering critical thinking, communication, adaptability, empathy and strong moral values alongside academic excellence.

As the school steps into its 45th year, it reaffirms its commitment to preserving its rich traditions while embracing innovation and change. Guided by its motto, "॥ न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ॥" (There is nothing as sacred and purifying as knowledge), PTVEMS looks forward to inspiring generations of learners and continuing its journey of excellence with gratitude, dedication and hope.

**Excerpts from the speech by Mrs Smita Biwalkar, Headmistress-, PTVEMS (Secondary) on the eve of school's 45th Foundation Day.**

## Math Culmination: Exploring the World of Sets

The Math Culmination Activity for Grade VIII was successfully conducted at PTV (ICSE) on 17 July on the topic "Sets." The activity was planned to help students understand the concepts of sets through interactive and hands-on learning.

As part of the activity, flash cards numbered from 1 to 40 were prepared and distributed to the students. These flash cards enabled students to actively participate in demonstrating various set operations. Teachers drew Venn diagrams to explain important concepts such as A – B and B – A, making the differences between the set operations clear and easy to understand.

To enhance interdisciplinary learning, four students presented a Math Rap, creatively correlating the concept of sets with other subjects. This innovative presentation made the learning experience enjoyable and memorable.



Overall, the culmination was informative, engaging, and activity-based, with enthusiastic participation from students of all three divisions. The activity effectively strengthened students' conceptual understanding of sets while promoting collaboration, creativity, and active learning.

## PTVEMS (Primary) celebrates its 45th Foundation Day

PTVEMS celebrated its Foundation Day with great enthusiasm on 29 June. A special speech was delivered by teacher Ms Olivia Falcao, who spoke about the glorious journey of the school, its achievements, and the values of discipline, hard work, and excellence that it continues to uphold. She encouraged the students to make the most of the opportunities provided by the school and to always strive for success with honesty and dedication.

Adding a nostalgic touch to the celebration, a beautiful slideshow of photographs was displayed. The pictures showcased memorable moments from the school's journey, including classroom activities, cultural programmes, sports events, annual functions, educational trips, and various achievements of the students and staff.



The Foundation Day celebration concluded with heartfelt gratitude to everyone who has contributed to the growth and success of the institution. The event filled everyone with pride and renewed their commitment to uphold the school's legacy.

**- Ms Olivia Falcao (Class Teacher of Std. IV C), PTVEMS**

# Enrich Opens a New Chapter in Literary Excellence

PTVEMS (Secondary) inaugurated its Literary Club, 'Enrich', on 15 July in the school hall. The programme began with the ceremonial lighting of the lamp by the Chief Guest, Dr Mrs Madhavi Gokhale, Headmistress Mrs Smita Biwalkar and Supervisor Mrs Vinitha Nair and Literary Club Advisor Mrs Anuradha Phatak.

The literary presentations commenced with Vedant Mulye (Std. V) narrating an inspiring story from the life of Gautam Buddha. The story conveyed the meaningful message that one should not be affected by the perceptions and opinions of others. Aayushi Walve (Std. VIII) recited a motivational poem that encouraged students to remain determined and courageous during difficult times. Saanvi Phatak (Std. IX) presented an extract from Sarojini Naidu's poem, 'In the Bazaars of Hyderabad', vividly bringing the colourful and vibrant marketplace to life.



The Head Boy, Parth Adarkar, introduced the Chief Guest. As a token of appreciation, Dr Madhavi Gokhale was felicitated by the Headmistress. In her address, Dr Madhavi Gokhale, a distinguished professor and accomplished speaker, emphasised the importance of developing listening, speaking, reading and writing skills. She encouraged students to communicate confidently, read widely and cultivate a lifelong love for language and literature. Her inspiring words motivated the students to appreciate the power of language as a means of expression, creativity and connection.

As part of the club's activities, a letter-writing competition was organised for the students of Std. IX. The best letters, written by Head Girl Sthira Divekar and Yash Godbole, were read aloud and the students were felicitated for their commendable work.

An exhibition of creative book covers prepared by the students of Std. VI was also displayed. The exhibits included thoughtful reflections on their favourite books and showcased the students' imagination, creativity and interest in reading.

The programme concluded with a vote of thanks proposed by the Head Girl. The inauguration was successfully organised under the guidance of the Literary Club Advisors Mrs. Anuradha Phatak, Mrs. Rathi Pillai, Ms Khushi Kapadia and Ms Nikita Singh.

# सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम संपन्न

पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यम माध्यमिक शाळेत इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. डिजिटल युगात वाढत्या ऑनलाइन फसवणुकीच्या घटना लक्षात घेऊन विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या कार्यक्रमासाठी विद्यालयाचे माजी विद्यार्थी व एथिकल हॅकर पार्थ भुवड हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना सायबर गुन्हे, ऑनलाइन फसवणूक, फिशिंग, सोशल मीडिया वापरताना घ्यावयाची काळजी, मजबूत पासवर्डचे महत्त्व, वैयक्तिक माहितीची गोपनीयता तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि सायबर सुरक्षेशी संबंधित नव्या आव्हानांविषयी सोप्या आणि रंजक पद्धतीने मार्गदर्शन केले.




श्री. भुवड यांनी प्रत्यक्ष उदाहरणांच्या माध्यमातून सायबर गुन्हेगार कोणत्या पद्धतीने लोकांची फसवणूक करतात आणि त्यापासून स्वतःचे संरक्षण कसे करावे, याबाबत विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्ण माहिती दिली. विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्तपणे प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले.

या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेविषयी जागरूकता निर्माण झाली असून सुरक्षित आणि जबाबदारीने डिजिटल माध्यमांचा वापर करण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

# सुशिक्षित, निरोगी आणि जबाबदार समाजाकडे वाटचाल



जागतिक लोकसंख्या दिन

११ जुलै हा दिवस दरवर्षी जागतिक लोकसंख्या दिन म्हणून साजरा केला जातो. वाढती लोकसंख्या, तिचे सामाजिक-आर्थिक परिणाम आणि शाश्वत विकासासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत जनजागृती करणे हा या दिवसामागील मुख्य उद्देश आहे.

सन १९८७ मध्ये जगाची लोकसंख्या ५ अब्ज झाली. या ऐतिहासिक टप्प्यानंतर वाढत्या लोकसंख्येमुळे निर्माण होणाऱ्या आव्हानांकडे जगाचे लक्ष वेधण्यासाठी संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाने (UNDP) १९८९ मध्ये जागतिक लोकसंख्या दिन सुरू करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर १९९० पासून हा दिवस जगभर मोठ्या प्रमाणावर साजरा केला जात आहे.

लोकसंख्या ही कोणत्याही देशाची मोठी ताकद असते. परंतु लोकसंख्या वाढीचा वेग नियंत्रित न राहिल्यास अनेक गंभीर समस्या निर्माण होतात. बेरोजगारी, अन्न व पाण्याची कमतरता, प्रदूषण, जंगलतोड, वाहतूक कोंडी, निवासस्थानांची टंचाई तसेच नैसर्गिक संसाधनांवर वाढणारा ताण या समस्यांचा समाजाला सामना करावा लागतो. त्यामुळे लोकसंख्या वाढ आणि उपलब्ध संसाधने यांचा समतोल राखणे अत्यंत आवश्यक आहे.

या समस्यांवर प्रभावी उपाय म्हणून कुटुंब नियोजन, महिलांचे शिक्षण व सक्षमीकरण, दर्जेदार आरोग्य सेवा, योग्य वयात विवाह, लोकजागृती आणि नैसर्गिक संसाधनांचा सुयोग्य वापर यांना प्राधान्य देणे गरजेचे आहे. स्त्री-पुरुष समानता आणि शिक्षणाचा प्रसार हे देखील शाश्वत विकासाचे महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत.

विद्यार्थी म्हणून समाजाप्रती आपलीही महत्त्वाची जबाबदारी आहे. पाणी आणि वीज यांची बचत करणे, वृक्षारोपण करणे, पर्यावरण स्वच्छ राखणे, शिक्षणाचा प्रसार करणे आणि जबाबदार नागरिक म्हणून समाजात सकारात्मक बदल घडवून आणणे, ही प्रत्येक विद्यार्थ्याची कर्तव्ये आहेत.

२०२६ च्या जागतिक लोकसंख्या दिनाची संकल्पना आहे - "Realizing the hopes and aspirations of young people - today and for the future." याचा अर्थ, आजच्या तरुणांच्या आशा-आकांक्षा पूर्ण करून त्यांना उज्ज्वल भविष्य घडवण्यासाठी आवश्यक संधी उपलब्ध करून देणे. युवा पिढी सक्षम, सुशिक्षित आणि निरोगी असेल तरच देशाच्या विकासाला नवी दिशा मिळू शकते.

आजच्या काळात लोकसंख्या हा केवळ आकड्यांचा विषय नसून मानवी विकास, आरोग्य, शिक्षण, पर्यावरण आणि शाश्वत भविष्य यांच्याशी निगडित एक महत्त्वाचा विषय आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने लोकसंख्येबाबत जागरूक राहून जबाबदारीने वागणे ही काळाची गरज आहे. आणि म्हणूनच शेवटी म्हणावेसे वाटते,

"लोकसंख्या ही देशाची ताकद आहे. पण ती सुशिक्षित, निरोगी आणि जबाबदार असेल, तरच देशाचा सर्वांगीण विकास शक्य आहे."

**- श्रीमती मानसी मनोज म्हात्रे**
**पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यमिक शाळा**




# सफर अंटार्टिकाची

पार्ले टिळक विद्यालय, मराठी माध्यम, माध्यमिक विभागात विज्ञान मंडळातर्फे शाळेतील विद्यार्थ्यांसाठी एक व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. पोलार वुमन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या डॉ. मधुबाला जोशी चिंचाळकर व्याख्यात्या म्हणून लाभल्या होत्या. डॉ. मधुबाला या जीएस वैद्यकीय महाविद्यालय व केईएम रुग्णालयात एमडी (भुलतज्ञ) असून राज्य शासनाच्या रुग्णालयात त्यांनी ३२ वर्षे उल्लेखनीय सेवा बजावली आहे. त्यांनी उपयोजित मानसशास्त्र या विषयात एम एस सी ही पदवी प्राप्त केली असून गेली पंधरा वर्षे शालेय समुपदेशनाच्या क्षेत्रात कार्यरत आहेत.

सन १९१७ मध्ये भारत सरकारने त्यांची भारतीय अंटार्टिका वैज्ञानिक मोहिमेसाठी वैद्यकीय अधिकारी म्हणून निवड केली. अंटार्टिका येथे असलेल्या भारताच्या "मैत्री" या संशोधन केंद्रात एक वर्ष राहण्याची संधी त्यांना मिळाली. अत्यंत कठीण परिस्थितीत तेथे राहून त्यांनी त्यांची वैद्यकीय सेवा तेथील व्यक्तींना दिली. या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना "पोलार वुमन" हा मानाचा सन्मान प्रदान करण्यात आला आहे. त्यांनी आजपर्यंत अंटार्टिकातील अनुभव, भारतीय वैज्ञानिक मोहीम आणि हवामान बदल या विषयावर २५० पेक्षा अधिक व्याख्याने दिली आहेत. त्यांच्या अनुभवावर आधारित माहितीपटाला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरवण्यात आले आहे. वैद्यकीय क्षेत्राबरोबरच देश पातळीवर सन्मानित असणाऱ्या या व्यक्तिमत्त्वाला भेटण्याची आणि त्यांचे अनुभव त्यांच्याच शब्दात ऐकण्याची संधी शाळेच्या विद्यार्थ्यांना मिळाली. त्यांनी अंटार्टिका खंडाची माहिती देत असतानाच तिथे चित्रीत केलेले व्हिडिओ विद्यार्थ्यांना दाखवले. मोठ्या प्रोजेक्टरवर ते चित्रीकरण पाहताना व त्यासंबंधी माहिती ऐकताना विद्यार्थी आणि शिक्षकांना अंटार्टिका खंडावर भ्रमण करण्याचा अनुभव मिळाला.

अंटार्टिकावरून चंद्र, सूर्य, ग्रह, तारे कसे दिसतात, ते क्षितिज समांतर जाताना का दिसतात याबद्दल त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. त्याचप्रमाणे बर्फाचे वादळ, नैसर्गिक बर्फाच्या गुहा, तेथील प्राणी व वनस्पती यांचे व्हिडिओ दाखवून माहिती सुद्धा दिली. या मोहिमेसाठी त्यांची निवड कशी झाली, त्यांनी कसे प्रशिक्षण घेतले या संदर्भात मोकळेपणाने सांगितले. अंटार्टिकावर राहताना कोणकोणत्या संकटांना तोंड द्यावे लागले हे ऐकताना सर्वांच्याच अंगावर काटा आला.

अंटार्टिका वरील संशोधन मानवासाठी कसे उपयुक्त ठरणार आहे, याबद्दल त्यांनी विस्तृतपणे सांगितले. त्याचप्रमाणे तेथील पर्यावरण स्वच्छ राहावे यासाठी किती कसोशीने काळजी घेतली जाते याबद्दलही विस्तृत माहिती दिली. पृथ्वीवरील बदलत्या हवामानाचा, तसेच वाढणाऱ्या उष्णतेचा फटका अंदमानातील प्राणी जीवनाला कसा बसत आहे हे मुलांना समजावून सांगितले. मुलांच्या मनातील अनेक प्रश्नांची त्यांनी सविस्तर उत्तरे दिली. त्याचप्रमाणे अंटार्टिकावरून आणलेले खडक मुलांना दाखवले.

**Clue 3 :**
**It is the result of permanent cutting or burning of trees. It harms the wildlife and reduces the green space.**







# शैक्षणिक सहलीतून विद्यार्थ्यांनी उलगडले विज्ञान, निसर्ग आणि इतिहास-भूगोलाचे विश्व

पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यमिक शाळेतर्फे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व पाठ्यपुस्तकातील ज्ञानाला प्रत्यक्ष अनुभवाची जोड देण्याच्या उद्देशाने १० जुलै रोजी विविध ठिकाणी शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले.

इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांना भायखळा येथील वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान व प्राणी संग्रहालयात नेण्यात आले. या सहलीत विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या वनस्पती, वृक्ष, औषधी वनस्पती तसेच विविध प्राणी-पक्ष्यांचे निरीक्षण करून त्यांचा अधिवास, जीवनशैली आणि जैवविविधतेविषयी माहिती जाणून घेतली. या भेटीमुळे विद्यार्थ्यांच्या विज्ञान विषयातील वनस्पती व प्राणी जीवन या घटकाचे ज्ञान अधिक दृढ झाले.

इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांनी सामाजिक शास्त्र विषयांतर्गत वरळी येथील नेहरू तारांगण तसेच त्याच परिसरातील 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' दालनाला भेट दिली. या भेटीत विद्यार्थ्यांनी खगोलशास्त्र, विश्वाची रचना, ग्रह-तारे याविषयी माहिती मिळवली. तसेच भारताच्या इतिहास, संस्कृती आणि विकासाचा प्रवास उलगडून दाखवणाऱ्या दालनाचेही अवलोकन केले.

इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांना विज्ञान विषयाच्या अभ्यासक्रमाशी संबंधित नेहरू सायन्स सेंटर येथे नेण्यात आले. विविध वैज्ञानिक प्रयोग, प्रतिकृती, संवादात्मक प्रदर्शने आणि विज्ञानातील आधुनिक संकल्पना प्रत्यक्ष पाहण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली. त्यामुळे विज्ञान विषयाबद्दलची जिज्ञासा आणि वैज्ञानिक दृष्टिकोन अधिक विकसित होण्यास मदत झाली.

या शैक्षणिक सहलीमुळे विद्यार्थ्यांना वर्गातील अध्ययनाबरोबरच प्रत्यक्ष निरीक्षण, अनुभवाधारित शिक्षण आणि ज्ञानाचा व्यावहारिक उपयोग समजून घेण्याची संधी मिळाली. विद्यार्थ्यांनीही या सहलीचा मनमुराद आनंद घेत विविध विषयांबद्दल नव्या दृष्टीने जाणून घेतल्याची भावना व्यक्त केली.

# A Step Towards Holistic Well-being

As part of its continued commitment to fostering the holistic development and well-being of its students, PTV (ICSE), in collaboration with CHEERS Child Health Care, organised a comprehensive medical screening camp for the primary and the secondary section.



The initiative aimed to promote preventive healthcare through the early identification of potential health concerns and to encourage lifelong healthy habits among students. The camp included Eye Screening, Audiology (Hearing) Assessment, Pediatric Check-up, and Dental Examination, conducted by a team of qualified healthcare professionals.

The camp was successfully conducted with the enthusiastic participation of students and the dedicated support of the school staff. PTV extends its sincere appreciation to CHEERS Child Health Care for partnering in this meaningful initiative, which reflects the school's unwavering commitment to nurturing healthy, confident, and well-rounded individuals.

# Plant a Tree Today, Breathe a Better Tomorrow!

Van Mahotsav was celebrated at PTVEMS (Primary) on 2 July to inspire students to appreciate and protect the environment. The celebration aimed to create awareness among children about the importance of conserving nature and planting more trees to ensure a greener, healthier, and more sustainable future.

As part of the celebration, the Grade 3 students showcased their creativity by hand-painting beautiful posters highlighting the significance of tree plantation. Each poster reflected the students' thoughts, love, and heartfelt feelings towards Mother Nature, conveying powerful messages about environmental conservation and the responsibility we all share in protecting our planet.

Van Mahotsav, India's annual tree-planting festival, was initiated by Dr K. M. Munshi in 1950 to encourage people across the country to plant trees and promote environmental awareness. Since then, it has served as a meaningful reminder that every tree planted today contributes to a better tomorrow.

The celebration concluded with a renewed commitment from the students to nurture nature and become responsible guardians of the environment.




**Clue 4 :**
**It gives a brand-new start to used bottles, paper and cans. It turns waste into useful things with a little smart touch.**

# Lokmanya Tilak: The Voice of India's Freedom Movement

Bal Gangadhar Tilak, one of the earliest mass leaders of India's freedom struggle, was honoured with the title 'Lokmanya', meaning 'accepted by the people', by his followers.



He transformed scattered political protests into a powerful mass movement by uniting people from different sections of society in the struggle for India's self-rule.

Tilak changed the nature of the freedom movement from merely submitting appeals to the British authorities to firmly demanding self-government. He inspired the nation with his immortal declaration, 'Swaraj is my birthright and I shall have it.' Under his leadership, the focus of the national movement gradually shifted from seeking concessions from the colonial rulers to asserting India's right to Swaraj.

One of Tilak's greatest contributions was his ability to involve ordinary people in the national movement. To overcome the restrictions imposed on political gatherings, he used cultural celebrations as a means of awakening national consciousness. He transformed the traditionally private celebration of Ganesh Utsav into a grand public festival that brought people together across caste and social divisions. Similarly, he promoted the public celebration of Shivaji Jayanti to inspire courage and patriotism by reminding people of the heroic deeds of Chhatrapati Shivaji Maharaj.

Tilak also recognised the power of journalism in creating public awareness. Along with his associates, he co-founded two newspapers—Kesari in Marathi and The Mahratta in English—to spread nationalist ideas and expose the injustices of British rule. His fearless writings and outspoken criticism of the colonial government led to his imprisonment on several occasions, including a six-year sentence in Mandalay Jail in Burma, now Myanmar.

Lokmanya Tilak helped lay the foundations for the large-scale national movements that were later led by Mahatma Gandhi. His vision, courage and unwavering faith in the power of the people inspired generations of Indians.

He demonstrated that a united and determined people could assert their right to self-rule and freedom.

On his death anniversary on 1st August, let us remember and pay tribute to this great patriot who awakened the spirit of nationalism and taught India to stand united in the struggle for freedom.

**- Sujay Kinjawadekar (Std. X B), PTVEMS (Secondary)**




# Kabir's Wisdom Comes Alive Through Art

To commemorate Kabirdas Jayanti, on 30 June, the students of Grade 4 of PTV (ICSE) participated in a creative and thought-provoking activity based on the timeless teachings of Saint Kabir.

After understanding the meanings of selected dohas through classroom discussions conducted by their Hindi teacher, students illustrated the message of the doha assigned to their class on A4-size sheets. They also reflected on the values conveyed by the dohas and expressed the life lessons they learnt from them.

Through this enriching experience, students explored values such as kindness, self-reflection, patience, perseverance, and the importance of timely action, while enhancing their creativity and communication skills.

The activity served as a meaningful blend of art, language, and value-based learning, bringing Kabir's wisdom alive for young minds.

# *The Joy of Music*

PTV ICSE (Primary) conducted an engaging and interactive Mass Music Class for students of Grades 3 to 5 led by Music Teacher, Mr Denver.



The session began with the students singing a few familiar songs, creating a cheerful and enthusiastic atmosphere.

Students enjoyed a fun listening game where they responded to guitar strokes with different clapping patterns. With their eyes closed, they relied solely on sound cues, strengthening their focus, listening skills and sense of rhythm.

A highlight of the session was the introduction to two-part vocal harmony. The girls and boys were taught different melodic parts, which were later combined to create a beautiful harmony. This activity helped students understand coordination and the joy of making music together.

The finale featured energetic performances of the "Sapphire" action song and the popular FIFA song, with students enthusiastically singing, moving and participating along with the music.

The lively conclusion filled the auditorium with excitement and left the students with a memorable musical experience.

# Let's make Bharat Nasha Mukt

As part of the nationwide Nasha Mukt Bharat Abhiyaan, an awareness programme was organised at PTVEMS (Secondary) on 25 June to encourage students to make informed choices and lead a healthy, substance-free life.

The programme began with a prayer and an introduction on protecting one's dreams and future through responsible decisions. An awareness presentation highlighted the physical, emotional and social effects of tobacco, alcohol, drugs and other addictive substances.

The main highlight was the skit 'The End of a Beautiful Beginning', written and directed by teacher and Science Club Advisor Mr Rajendra Sanga. Through effective dialogues and emotional storytelling, it portrayed the harmful impact of addiction on health, relationships, confidence and aspirations.



A reflective interaction, a group recitation on the theme 'Choose Dreams, Not Drugs' and the Nasha Mukti Pledge reinforced the message of the campaign.

Students also prepared awareness posters under the guidance of the Science Club advisers, Mrs Smruti Mogrey, Mr Amit Palav and Mr Deepak Patel.

The programme successfully created awareness and encouraged students to adopt healthy habits, resist negative peer influence and contribute towards building a Nasha-Mukt Bharat.

# 'उडान' किशोर-किशोरी विकास कार्यशाळेद्वारे सर्वांगीण विकासाचा संकल्प

इनरव्हील क्लब ऑफ मुंबई पार्लेश्वर आणि विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी (विलेपार्ले-अंधेरी शाखा) यांच्या संयुक्त विद्यमाने 'उडान' किशोर-किशोरी विकास कार्यशाळेचा शुभारंभ २० जुलै रोजी परांजपे विद्यालय माध्यमिक विभागात उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आला. ९ ते १६ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेला हा विशेष उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देणारा ठरणार आहे.



या उपक्रमांतर्गत वर्षभर विद्यार्थ्यांसाठी योगासने, सूर्यनमस्कार, विविध वैयक्तिक व सांघिक खेळ, मैत्री, सकस आहार, श्रेयस-प्रेयस, स्वसंरक्षण, आत्मिक व बाह्य सौंदर्य अशा विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच गटचर्चा, संवादात्मक उपक्रम आणि कृतीप्रधान सत्रांच्या माध्यमातून किशोरवयात होणाऱ्या शारीरिक व मानसिक बदलांविषयी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन केले जाणार आहे.

विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, नेतृत्वगुण, वक्तृत्व कौशल्य, संघभावना आणि सकारात्मक विचारसरणी विकसित व्हावी, तसेच जीवनमूल्यांची जपणूक करत सक्षम व्यक्तिमत्त्व घडावे, हा या कार्यशाळेचा प्रमुख उद्देश आहे.

कार्यशाळेच्या प्रारंभी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. हाक्के सर यांनी उपक्रमासाठी उपस्थित असलेल्या मार्गदर्शक शिक्षकांचा विद्यार्थ्यांशी परिचय करून दिला. त्यांनी या उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांनी वर्षभर होणाऱ्या सर्व सत्रांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेऊन स्वतःचा सर्वांगीण विकास साधावा, असे आवाहन केले.

# विमान सुरक्षा जनजागृती शिबिरात विद्यार्थ्यांनी घेतली सुरक्षिततेची शपथ

परांजपे विद्यालय माध्यमिक विभागात विद्यार्थ्यांमध्ये विमान सुरक्षेविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने एक विशेष शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात मुंबई विमानतळाच्या वतीने विशाल अहिरे यांनी विद्यार्थ्यांना विमान सुरक्षेशी संबंधित महत्त्वपूर्ण बाबींची माहिती दिली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. हाक्के सर यांनी विशाल अहिरे यांचा परिचय करून देत विद्यार्थ्यांना या शिबिराचे महत्त्व पटवून दिले. त्यानंतर श्री. अहिरे यांनी पॉवरपॉइंट प्रेझेंटेशनच्या माध्यमातून विमान अपघातांची विविध कारणे सविस्तरपणे स्पष्ट केली. विमानतळ परिसरात पक्ष्यांना खाऊ घालण्यात येणारे अन्न, उष्टे खाद्यपदार्थ आणि त्यामुळे वाढणारा पक्ष्यांचा वावर यामुळे विमान उड्डाण किंवा अवतरण करताना पक्षी विमानाच्या इंजिन अथवा पंखांमध्ये अडकून अपघात घडू शकतात, याची त्यांनी माहिती दिली. तसेच अवैधरित्या उडवले जाणारे ड्रोन, मुलांकडून वापरले जाणारे लेझर गेम्स, धावपट्टीवर उडून येणारा प्लास्टिकचा कचरा आणि उघड्यावर टाकलेले अन्न यांमुळे निर्माण होणारे धोकेही त्यांनी उदाहरणांसह स्पष्ट केले. या सर्व बाबींमुळे विमान सुरक्षेला कसा धोका निर्माण होतो आणि नागरिक म्हणून आपण कोणती काळजी घ्यावी, याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनीही या विषयात उत्स्फूर्त सहभाग घेत विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले.



कार्यक्रमाच्या शेवटी विमान सुरक्षा जपण्याबाबत विद्यार्थ्यांकडून प्रतिज्ञा ग्रहण करण्यात आली. सुरक्षिततेस बाधा आणणाऱ्या कोणत्याही कृतीत सहभागी होणार नाही तसेच इतरांनाही त्याबाबत जागरूक करू असा संकल्प विद्यार्थ्यांनी केला. समारोपप्रसंगी मुख्याध्यापक श्री. हक्के सर यांनी विशाल अहिरे यांचे आभार मानले. तसेच विद्यालयातील सर्व विद्यार्थी विमान सुरक्षेसाठी आवश्यक ती दक्षता घेतील आणि समाजातही जनजागृती करतील असा विश्वास व्यक्त केला.



# शिवराज्याभिषेक सोहळा साजरा

पार्ले टिळक विद्यालय प्राथमिक मराठी शाळेमध्ये विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेक सोहळ्याविषयी माहिती देण्यासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना शिवराज्याभिषेक सोहळ्याचा माहितीपूर्ण व्हिडीओ दाखवण्यात आला. व्हिडीओच्या माध्यमातून शिवराज्याभिषेकाचा इतिहास, त्यामागील उद्देश, रायगडावरील सोहळ्याचे महत्त्व तसेच छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य, दूरदृष्टी आणि स्वराज्य स्थापनेचे कार्य विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले.

**Clue 5 :**
**It is the variety of life on Earth, both big and small. From insects to elephants, it includes them all.**

# महाकवी कालिदास जयंती उत्साहात

परांजपे विद्यालयाच्या माध्यमिक विभागात १५ जुलै २०२६ रोजी महाकवी कालिदास जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. आषाढ महिन्याच्या प्रथम दिवशी भारतातील महान संस्कृत कवी व नाटककार महाकवी कालिदास यांची जयंती साजरी करण्याची परंपरा आहे. या निमित्ताने विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक व प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



महाकवी कालिदास हे संस्कृत साहित्यातील श्रेष्ठ कवी व नाटककार मानले जातात. निसर्गवर्णन, मानवी भावना आणि काव्यसौंदर्य यांचा अप्रतिम संगम त्यांच्या साहित्यकृतींमध्ये आढळतो. 'अभिज्ञानशाकुंतलम्', 'मेघदूत', 'रघुवंश', 'कुमारसंभव', 'ऋतुसंहार' यांसारख्या अजरामर साहित्यकृतींमुळे त्यांना जागतिक कीर्ती प्राप्त झाली आहे. त्यांच्या साहित्यामुळे भारतीय संस्कृती, निसर्गप्रेम आणि जीवनमूल्यांचा प्रभावी परिचय घडतो.

या कार्यक्रमानिमित्त विद्यालयातील शिक्षिका भाग्यश्री बर्वे यांनी ध्वनिक्षेपकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना महाकवी कालिदास यांच्या जीवनकार्याची व साहित्याची अतिशय सुंदर आणि माहितीपूर्ण ओळख करून दिली. त्यांच्या साहित्यवैभवाचे महत्त्व विद्यार्थ्यांना सोप्या व प्रभावी भाषेत समजावून सांगितले.

याचबरोबर कालिदास यांच्या साहित्यकृतींचे आकर्षक फ्लोचार्ट तयार करून ते विद्यालयाच्या काचफलकावर प्रदर्शित करण्यात आले. तसेच त्यांच्या विविध साहित्यकृतींचे प्रदर्शन विद्यालयाच्या दर्शनी भागात भरवण्यात आले होते. या प्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांना कालिदासांच्या साहित्याचा प्रत्यक्ष परिचय होऊन त्यांना वाचनाची प्रेरणा मिळाली.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये संस्कृत साहित्याविषयी आवड निर्माण झाली, तसेच भारतीय साहित्यपरंपरेतील महाकवी कालिदास यांच्या अतुलनीय योगदानाची जाणीव अधिक दृढ झाली.

# वक्तृत्व स्पर्धा : लोकमान्यांच्या विचारांचा आणि प्रभावी वक्तृत्वाचा वारसा







परांजपे विद्यालय माध्यमिक विभागात तसेच पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यमिक विभागात २३ जुलै २०२६ रोजी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. तर पार्ले टिळक विद्यालय मराठी प्राथमिक शाळेत कथाकथन स्पर्धेची पहिली फेरी घेण्यात आली.

प्रखर राष्ट्रभक्त, थोर विचारवंत आणि असामान्य वक्ते असलेल्या लोकमान्य टिळक यांच्या ओजस्वी, अभ्यासपूर्ण आणि प्रभावी वक्तृत्वशैलीचा आदर्श विद्यार्थ्यांसमोर ठेवून त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील हे महत्त्वाचे गुण विद्यार्थ्यांनी आत्मसात करावेत, या उद्देशाने दरवर्षी या स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. लोकमान्य टिळकांच्या विचारांतील स्पष्टता, तर्कशुद्ध मांडणी आणि ओजस्वी अभिव्यक्ती ही प्रत्येक विद्यार्थ्यासाठी प्रेरणादायी आहे. या प्रेरणेतून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, अभ्यासू वृत्ती आणि प्रभावी संवादकौशल्य विकसित व्हावे, हा या स्पर्धेमागील प्रमुख हेतू आहे.

परंपरेप्रमाणे वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना १ ऑगस्ट रोजी लोकमान्य टिळकांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ध्वनीक्षेपकावरून सर्व विद्यार्थ्यांसमोर आपले भाषण सादर करण्याची मानाची संधी दिली जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये या स्पर्धेबद्दल विशेष उत्सुकता आणि प्रेरणा निर्माण होते.

